# मार्गदर्शिका

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास सहाय्य

## आर्थिक वर्ष २००६-०७

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडच्या वीज दराचा आढावा

## जुलै, २००६

(ही मार्गदर्शिका प्राइसवॉटरहाऊसकूपर्स, आयोगाचे सल्लागर, यांनी तयार केली आहे)

## अनुक्रमणिका


| | | पान क्र. |
|---|---|---|
| अ-१ | प्रस्तावना | ३ |
| अ-२ | वीज दरातील प्रत्यक्ष वाढ | ५ |
| अ-३ | ‘महागडी वीज ग्राहकाने खरेदी करावी किंवा नाही ’ हा पर्याय जनतेपुढे ठेवणे | ७ |
| | संभाव्य चित्र -१ | ९ |
| | संभाव्य चित्र -२ | १० |
| | संभाव्य चित्र -३ | १२ |
| अ-४ | वहन आकार ठरविणे | १३ |

## अ: १ प्रस्तावना

१.१ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (येथून पुढे ''आयोग'' म्हणून संबोधण्यात येईल) तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकरिता (मराविमं) वीज दरांचे तीन आदेश (आर्थिक वर्ष २००१, आर्थिक वर्ष २००२, आर्थिक वर्ष २००४) निर्गमित केले आहेत.

१.२ विद्युत अधिनियम २००३ लागू केल्यानंतर त्यातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने दिनांक २४ जानेवारी, २००५ च्या शासन निर्णयाद्वारे, पूर्वीच्या मराविमंची चार कंपन्यांमध्ये पुनर्रचना करुन मराविमं होल्डिंग कंपनी, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लिमिटेड (महा निर्मिती कंपनी), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (महा पारेषण कंपनी) आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महा वितरण कंपनी), या ४ कंपन्याची दिनांक ६ जून, २००५ रोजी स्थापना केली.

१.३ महा वितरण कंपनीने, एक वितरण आणि किरकोळ विद्युत पुरवठा करणारा परवानाधारक म्हणून, अधिनियमाच्या कलम ६१, ६२ व ६४ आणि मविनिआ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ नुसार, दिनांक २८ फेब्रुवारी, २००६ रोजी एकूण महसूलाची गरज (ए आर आर ) आणि दिनांक २६ मार्च , २००६ रोजी आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वीज दर याचिका सादर केली आहे. वीज दराच्या याचिकेत, महा वितरण कंपनीने एआरआरमध्ये काही सुधारणा केल्या आहेत. कंपनीने रु. ५४६२ कोटींची महसूली तूट अपेक्षित केली असून ती तूट भरून काढण्यासाठी त्यांनी वीज दरामध्ये सरासरी २८.८% वाढ प्रस्तावित केली आहे.

१.४ आयोगाने, महा वितरण कंपनीच्या एआरआर आणि वीज दर याचिकेचा आढावा घेण्यासाठी प्राइसवॉटरहाऊसकूपर्स (पी डब्ल्यु सी) यांची सल्लागार म्हणून नेमणूक केली आहे. या याचिकांच्या प्राथमिक आढाव्यानुसार असे आढळून आले की, वीज ग्राहक, वीज पुरवठ्याचा दर्जा आणि वीज दर यांच्यावर गंभीर परिणाम करू शकतील अशा महत्वाच्या प्रश्नांवर महा वितरण कंपनीने वीज दर प्रस्तावात नेमका भर दिलेला नाही. या महत्वाच्या प्रश्नांवर सार्वत्रिक विचार-मंथन व्हावे या उद्देशाने त्यावर भर देणारी

एक मार्गदर्शिका प्रसृत करणे उचित होईल, असे वाटल्याने, ही मार्गदर्शिका जनतेपुढे मांडण्यात येत आहे. महत्वाच्या प्रश्नांत खालील मुद्दे समाविष्ट आहेत-

(अ) किरकोळ वीज पुरवठ्याच्या वीज दरातील प्रत्यक्ष वाढ

(ब) 'महागडी वीज ग्राहकाने खरेदी करावी किंवा नाही ' हा पर्याय जनतेपुढे ठेवणे

(क) वहन आकार ठरविणे

१.५ आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वीज दराचा आढावा घेण्यासाठी महा वितरण कंपनीने ( अतिरिक्त माहिती धरुन) सादर केलेल्या माहितीचा पी डब्ल्यु सीने या मार्गदर्शिकेसाठी उपयोग केला आहे. पी डब्ल्यु सीकडे एआरआर आणि वीज दर यांचा आढावा घेण्याचे काम सोपविण्यात आले आहे आणि या मार्गदर्शिका टिपणीसाठी सादर करण्यात आलेल्या माहिती पुरताच माहितीचा स्त्रोत मर्यादित ठेवण्यात आला आहे. परिणामी, आर्थिक वर्ष २००६-०७ साठी महा वितरण कंपनीने एआरआर आणि वीज दराच्या आढाव्यासाठी सादर केलेली माहितीच विचारात घेण्यात आली आहे. यामुळे, सादर करण्यात आलेल्या माहितीचा संदर्भ लावणे ग्राहकांना सोपे जाईल. प्रश्नांची समज अधिक चांगली व्हावी आणि स्वारस्य असलेल्या बाबींवर सर्वसाधारण मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने हे विश्लेषण तयार करण्यात आले आहे.

## अ: २ वीज दरातील प्रत्यक्ष वाढ

२.१ अंदाजित एकूण महसूलाची गरज आणि विद्यमान वीज दरातून मिळणारा अपेक्षित अमहसूल, यांच्या आधारे आर्थिक वर्ष २००६-०७ करिता रु. ५,४६२ कोटीची महसूली तूट महा वितरण कंपनीने त्यांच्या वीज दर याचिकेत अपेक्षित धरली आहे. या महसूली तूटीची परिगणना करण्यासाठी आर्थिक वर्ष २००४-०५ आणि आर्थिक वर्ष २००५-०६ या मागील वर्षांचा तोटा समाविष्ट केला आहे. आर्थिक वर्ष २००५ चा तोटा रु. ५१३ कोटी आणि आर्थिक वर्ष २००६ चा तोटा रु. १,४०१ कोटींचा आहे. महा वितरण कंपनीची सन २००५, सन २००६ आणि सन २००७ ची एकूण तूट रु. ५,४६२ कोटीची असून ती भरुन काढण्यासाठी दरवाढ करण्याचा महा वितरण कंपनीचा इरादा आहे.

२.२ महा वितरण कंपनीने नियामक दायित्व आकारांसह विद्यमान वीज दरातून मिळणारा अपेक्षित महसूल रु. १८,९४२ कोटी धरला आहे. विद्यमान वीज दरातून मिळणारा अपेक्षित महसूल आणि महसूली तूट लक्षात घेऊन, महा वितरण कंपनीने वीज दरात २८.८% ची सरासरी वाढ प्रस्तावित केली आहे. या दरवाढीमुळे, महसूल रु. १८,९४२ कोटी वरुन रु. २४, ४०५ कोटी इतका वाढणार असून त्यामुळे महसूली तोटा पूर्णपणे भरुन काढणे शक्य होईल. याबाबतचा तप्शील खालील तक्त्यात दाखविण्यात आला आहे.

| तपशील | रु./युनिट | महसूल (रु. कोटी) |
|---|---|---|
| महा वितरण कंपनीने प्रस्तावित केल्याप्रमाणे विद्यमान वीज दरातून मिळणारा महसूल | ३.५६[१] | १८,९४२ |
| प्रस्तावित वीज दरातून मिळणारा महसूल | ४.५८ | २४, ४०५ |
| **वीज दरात प्रस्तावित केलेली सरासरी वाढ** | | **२८.८%** |

----------------

१

सर्व प्रवर्गाच्या ग्राहकांकडून मिलालेल्या महसूलास सर्व प्रवर्गांना केलेल्या विक्रीने भागले असता, महा वितरण कंपनीला मिळणारा सरासरी प्रति युनिट महसूल रु. ३.५६ इतका होतो.

२.३ महा वितरण कंपनीने त्यांच्या प्रस्तावात नियामक दायित्व आकार ( ५० पैसे/युनिट) आणि इंधन समायोजन आकार (९६ पैसे/युनिट) विद्यमान वीज दरात एकत्रीत केले. सबसिडी देणा-या ग्राहकांना महा वितरण कंपनी कडून लावण्यात येणारा नियामक दायित्व आकार हा स्थिर असून इंधन समायोजन आकार हा स्थिर नसून विशिष्ट महिन्यात किंवा तिमाहीत होण-या इंधनाच्या किंमतीतील बदलांवर अवलंबून असतो.

२.४ आयोगाने फक्त फेब्रुवारी,२००६ या महिन्याकरिता ९६ पैसे/युनिट या दराने इंधन समायोजन आकार लावण्यास मंजूरी दिली होती. मात्र महा वितरण कंपनीने इंधन समायोजन आकार विद्यमान वीज दरात समाविष्ट करुन तो संपूर्ण २००६-०७ च्या आर्थिक वर्षाकरिता लागू केला. आर्थिक वर्ष २००५-०६ करिता मान्यता दिलेला सरासरी इंधन समायोजन आकार (४९ पैसे/युनिट) होता व त्यामुळे विद्यमान वीज दराचा तो एक भाग म्हणून रु. ९६ पैसे/युनिट ऐवजी ४९ पैसे/युनिट समजणे उचित होईल. याप्रमाणे विद्यमान वीज दरात दुरुस्ती केल्यास, महा वितरण कंपनीने वीज दरात प्रस्तावित केलेली वाढ ही २८.८% न होता ती ४३% होईल.

| **तपशील** | **रु./ kwh** | **महसूल (रु. कोटी)** |
|---|---|---|
| इंधन समायोजन आकार वगळून विद्यमान वीज दराने मिळणारा महसूल | २.७१ | १४,४४९ |
| सरासरी इंधन समायोजन आकारावर आधारित इंधन समायोजन आकारापासून मिळणारा महसूल | ०.४९ | २,६०१ |
| इंधन समायोजन आकारासह असलेल्या विद्यमान वीज दराने मिळणारा महसूल | ३.२० | १७,०५० |
| प्रस्तावित वीज दराने मिळणारा महसूल | ४.५८ | २४,४०५ |
| वीज दरातील प्रत्यक्ष वाढ | | **४३%** |

२.५ महा वितरण कंपनीने सादर केलेल्या एआरआर आणि वीज दराच्या प्रस्तावाव्र प्रतिसाद देणा-या जनतेला वरील वस्तुस्थिती विचारात घावी लागेल.

## अः ३ 'महागडी वीज खरेदी करावी किंवा नाही' हा पर्याय जनतेपुढे ठेवणे

३.१ आर्थिक वर्ष २००३-०४ च्या वीज दराच्या आदेशातील वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च रु. ३.०७ प्रति युनिट वरुन महा वितरण कंपनीच्या आर्थिक वर्ष २००६-०७च्या याचिकेत तो रु. ४.५८ प्रति युनिट इतका वाढला आहे. महा वितरण कंपनीने, वीज दरात वाढ प्रस्तावित केली आहे (प्रत्यक्षातील दरवाढ ४३%). वीज पुरवठ्यावरील खर्च आणि वीज दरातील अशा वाढीच्या कारणांपैकी एक महत्वाचे कारण म्हणजे राज्यातील भार नियमनाच्या काळातील विजेची तूट भरून काढण्यासाठी महा वितरण कंपनीला, रत्नागिरी गॅस ॲड पॉवर प्रा. लि. यांचे विद्युत केंद्र तसेच व्यापारी वीज, यासारख्या महागड्या वीज निर्मिती केंद्रांवर विजेसाठी अवलंबून रहावे लागणे, हे आहे.

३.२ दर्जेदार वीज पुरवठ्याच्या म्हणजे कमी किंवा अजिबात भार नियमनरहित वीज पुरवठ्याच्या परिणामांबाबत ग्राहकांनी जागरुकता दखविणे, उचित होईल असे वाटते. सध्या, महा वितरण कंपनी, राज्यातील व केंदीय विद्युत निर्मिती केंद्राशी केलेल्या करारांतर्गत (संविदाकृत) विद्युत पुरवठ्यामुळे राज्यातील विजेच्या मागणी-पुरवठ्यातील तुटीला तोंड देत आहे. तसेच, ही तूट भरुन काढण्यासाठी महा वितरण कंपनी व्यापारी आणि इतर विद्युत निर्मिती केंद्राकडूनही महागडी वीज खरेदी करीत आहे. परिणामी, वीज पुरवठ्याच्या खर्चात वाढ होत असून वीज दरातही वाढ मागावी लागत आहे.

३.३ विविध ग्राहक संस्थांशी चर्चा केल्यावर असे लक्षात आले की भार नियमनातील कपातीची किंमत चुकती करण्यास सर्वच ग्राहक तयार होणार नाहीत व त्यामुळे जे ग्राहक भार नियमनातील कपातीची किंमत चुकती करण्यास तयार असतील अशाच ग्राहकाना वीज पुरवठ्याचा वाढीव खर्च आणि वीज दरातील वाढ लागू करावी लागेल. राष्ट्रीय वीज धोरणात देखील असे विहीत करण्यात आले आहे की, जे ग्राहक वाजवी खर्चावर आधारित वीज दर भरण्यास तयार आहेत, त्यांना अखंडीतपणे २४ तास वीज पुरवठा मिळाण्याचा अधिकार आहे.

३.४ महा वितरण कंपनी आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज (CII) च्या मदतीने, पुणे नागरी विभागात वीज पुरवठा अखंडीत रहावा म्हणून ‘ महागडी वीज ग्राहकाने खरेदी करावयाची किंवा नाही ’ हा पर्याय आयोगाने नुकताच जनतेपुढे ठेवला. महागड्या स्त्रोतांकडून वीज खरेदीचे परिणाम नीट समजावेत यासाठी, जादा वीज खरेदी केल्यामुळे भार नियमनाचे तास कमी होणे आणि वीज दरात वाढ होणे, यावर भर देऊन काही संभाव्य चित्रे सादर करण्यात आली आहेत. परवानाधारकाने सादर केलेल्या माहितीवर आधारित ही संभाव्य चित्रे परिणामदर्शक आहेत.

३.५ आयोगाने भार नियमनाची कार्यपध्दती ठरवून दिलेली आहे व त्यामध्ये विभागांचे नागरी आणि औद्योगिक वस्त्या, शेती प्रभावित भाग आणि इतर भाग, असे प्रवर्ग करण्यात आले आहेत आणि त्या विभागातील वितरण आणि वसूलीच्या हानीवर आधारित, अ, ब, क आणि ड गट, असे त्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. हे गट खाली दाखविल्याप्रमाणे आहेत-

| | **गट** | **विशेष सरासरी हानी आणि वसूलीच्या कार्यक्षमतेची पातळी** | |
|---|---|---|---|
| | | **नागरी** | **ग्रामीण** |
| १ | गट अ | ०% ते २५% | 0% ते २८% |
| २ | गट ब | > २५% ते ३५% | > २८% ते ३८% |
| ३ | गट क | > ३५% ते ५०% | > ३८% ते ५३% |
| ४ | गट ड | ५०% वर | ५३% वर |
| | | | |

३.६ महावितरण कंपनीने करावयाच्या भार नियमनासंबंधातील तत्त्वे व कार्यपध्दतीत सुधारणा करण्यासंबधीच्या प्रकरणी दिनांक १० जानेवारी, २००६ रोजी दिलेल्या आदेशामध्ये मागणी-पुरवट्यातील ४५०० मेगावॅटच्या तूटीकरिता आयोगाने सुधारित भार नियमन योजना खालीलप्रमाणे सुचविली आहे-

| **विभाग** | **नागरी व औद्योगिक वस्त्या** | **इतर विभाग** | **शेती प्रभावित विभाग** | **संध्यकाळच्या कमाल मागणीच्या वेळी विद्युत भारातील अपेक्षित दिलासा** |
|---|---|---|---|---|
| गट | तास | तास | तास | MW |
| **अ** | २.५ | ४.५ | ११.० | ४०००-४५०० |
| **ब** | ३.० | ५.० | ११.५ | |
| **क** | ३.५ | ५.५ | १२.० | |
| **ड** | ४.० | ६.० | १२.० | |

३.७ खालील संभाव्य चित्रे ही वरील गटवारीवर आणि भार नियमनाच्या कार्यपध्दतीवरील चर्चेवर आधारित आहेत-

**संभाव्य चित्र -१**

३.८ या संभाव्य चित्रात महा वितरण कंपनीने करावयाच्या वीज खरेदीत रत्नागिरी गॅस आणि पॉवर प्रा. लि. यांच्या विद्युत केंद्रातील तसेच व्यापारी इ. यांच्याकडील महागड्या वीज खरेदीचा समावेश आहे. हे संभाव्य चित्र महा वितरण कंपनीच्या सध्याच्या याचिकेप्रमाणे आहे, ज्यामध्ये भार नियमनाचे तास कमी करण्यासाठी महागड्या वीज स्त्रोतांकडून वीज खरेदी करणे गृहित धरले आहे.

३.९ भार नियमनाच्या कार्यपध्दतीनुसार ऑक्टोबर २००६ आणि डिसेंबर २००६ या महिन्यातील भार नियमनाचे प्रमाणासंबंधीचे संभाव्य चित्र खालील प्रमाणे राहील. यंत्रणेवर आलेल्या प्रत्यक्ष मागणीनुसार भार नियमनाच्या तासात बदल होईल हे दाखविण्यासाठी, दोन महिन्यातील भार नियमनाची माहिती देण्यात आली आहे.

| महिना | विभाग | नागरी व औद्योगिक वस्त्या | इतर विभाग | शेती प्रभावित विभाग |
|---|---|---|---|---|
| ऑक्टो.०६ | अ | २.२५ | ४.२५ | ७.५० |
| | ब | २.७५ | ४.७५ | ८.०० |
| | क | ३.२५ | ५.२५ | ८.५० |
| | ड | ३.७५ | ५.७५ | ९.०० |
| डिसें.०६ | अ | २.५० | ४.५० | ११.०० |
| | ब | ३.०० | ५.०० | ११.५० |
| | क | ३.५० | ५.५० | १२.०० |
| | ड | ४.०० | ६.०० | १२.०० |

३.१० या संभाव्य चित्रात, विभागात असलेल्या गट आणि प्रवर्गावर आधारित भार नियमनाचा कालावधी २.२५ तास ते १२ तासांचा आहे. भार नियमनाचा कमाल कालावधी हा शेती प्रभावित विभाग या ड प्रवर्गासाठी रोज १२ तासांचा आहे तर किमान कालावधी नागरी व औद्योगिक वस्त्या या अ प्रवर्गाकरिता प्रति दिन २.५ तासांचा आहे.

३.११ संभाव्य चित्र -१ नुसार वीज दरावर होणारे परिणाम खालील तक्त्यात दर्शविण्यात आले आहेत-

| **संभाव्य चित्र- १ (२००६-०७)** | **२००६-०७** | **महसूलातील तूट (सुधारित वीज दर) )** | **महागड्या विजेसह** |
|---|---|---|---|
| एकूण महसूलाची गरज (रु. कोटी) | २४४०५ | | |
| अपेक्षित विक्री | ५३,२५४ | | |
| विद्यमान वीज दरापासून मिळणारा महसूल (रु. कोटी) | १८९४२ | १७०५० | |
| महसूलातील एकत्रित तूट (रु. कोटी) | ५४६२ | ७३५५ | |
| | | | |
| | **विद्यमान वीज दर (सादर केल्याप्रमाणे)** | **विद्यमान वीज दर (सुधारित)** | **New tariff** |
| महावितरण कं.चा सरासरी वीज दर | **३.५६** | **३.२०** | **४.५८** |
| विद्यमान वीज दराच्या तुलनेत वीज दराची टक्केवारीतील वाढ/घट (सादर केल्याप्रमाणे) | | | **२८.८%** |
| विद्यमान (सुधारित) वीज दराच्या तुलनेत वीज दराची टक्केवारीतील वाढ/घट | | | **४३%** |

३.१२ वरील तक्त्यावरुन दिसून येईल की, वरील वाढीव खर्च, विशेषतः महागड्या स्त्रोतांकडून होणारा वीज खरेदीवरील खर्च भागविण्यासाठी, महा वितरण कंपनीला एकूण ४३% ची वीज दरात वाढ करावी लागेल.

**संभाव्य चित्र -२**

३.१३ या संभाव्य चित्रात, महा वितरण कंपनीच्या वीज खरेदीमध्ये रात्नागिरी गॅस ॲंड पॉवर यांचे विद्युत केंद्र, व्यापारी, यांच्यासारख्या महागड्या स्त्रोतांकडून विजेची खरेदी केलेली नाही, असे गृहीत धरण्यात आले आहे. महागड्या स्त्रोतांकडून वीज खरेदी केली नाही या गृहीतावर आधारित भार नियमनाचे तपशील खालील तक्त्यामध्ये देण्यात आले आहेत.

| **महिना** | **विभाग** | **नागरी व औद्योगिक वस्त्या** | **इतर विभाग** | **शेती प्रभावित विभाग** |
|---|---|---|---|---|
| ऑक्टो. ०६ | अ | ४.०० | ६.०० | १२.५० |
| | ब | ४.५० | ६.५० | १३.०० |
| | क | ५.०० | ७.०० | १३.५० |
| | ड | ५.५० | ७.५० | १३.५० |
| डिसे. ०६ | अ | ६.५० | ९.०० | १५.५० |
| | ब | ७.०० | ९.५० | १६.०० |
| | क | ७.५० | १०.०० | १६.५० |
| | ड | ८.०० | १०.५० | १६.५० |

३.१४ महागड्या स्रोतांकडून विजेची खरेदी न केल्यामुळे भार नियमनाचे तास वाढले आहेत. महागड्या स्त्रोतांकडून वीज खरेदी होत असताना वर उल्लेखिलेल्या सर्व प्रवर्गांमध्ये, जे भार नियमन २.२५ ते १२ तासांचे होते ते आता ती वीज खरेदी न केल्याने ४.०० ते १६.५० तासांपर्यंत वाढले आहे.

३.१५ या संभाव्य चित्रात, भार नियमनाचे तास, आयोगाने घालून दिलेल्या १२ तासांच्या मर्यादेपेक्षा जास्त होतील.

३.१६ संभाव्य चित्र -२चे वीज दरावर होणारे परिणाम खालील तक्त्यामध्ये दाखविले आहेत- .

| **संभाव्य चित्र -२ (२००६-०७)** | **याचिकेप्रमाणे वीज दर** | **सुधारित वीज दर** | **महागड्या विजेशिवाय** |
|---|---|---|---|
| वार्षिक महसूलाची गरज ( रु. कोटी) | २०३१२ | २०३१२ | |
| सुधारित अपेक्षित विक्री | ४७,४९७ | ४७,४९७ | |
| **विक्रीपासून मिळणारा एकूण महसूल (महागड्या विजेशिवाय)** - | १७२३६ | १५४७२ | |
| महससूलातील तूट (रु. कोटी) | ३०७७ | ४८४० | |
| | | | |
| | | | **नवीन वीज दर** |
| महावितरण कं.चा सरासरी वीज दर | | | **४.२८** |
| विद्यमान वीज दराच्या तुलनेत वीज दराची टक्केवारीतील वाढ/घट (सादर केल्याप्रमाणे) | | | **१८%** |
| विद्यमान (सुधारित) वीज दराच्या तुलनेत वीज दराची टक्केवारीतील वाढ/घट | | | **३१%** |

३.१७ संभाव्य चित्र-२ मध्ये महा वितरण कंपनी महागड्या स्त्रोतांकडून अतिरिक्त वीज खरेदी करीत नसल्यामुळे त्यांच्या वीज खरेदीवरील खर्चात घट होईल. सुधारित भार नियमनामुळे प्रवर्गांना केलेली विजेची विक्री कमी होऊन त्यांच्या महसूलात देखील घट होईल. महागडी वीज न खरेदी करण्याचा एकूण परिणाम म्हणून वीज दरात ४३% ऐवजी ३१% वाढ होईल.

३.१८ संभाव्य चित्र -१ व -२ च्या विश्लेषणावरुन असा अन्वयार्थ लावता येईल की, १.७५ ते ४.५ तासांचे जादा भार नियमन टाळण्यासाठी, ग्राहकांना १२% इतका अधिक वीज दर द्यावा लागेल.

### संभाव्य चित्र -३

३.१९ संभाव्य चित्र -१ व २ मध्ये महागड्या वीज खरेदीवरील खर्च राज्यातील ग्राहकांच्या सर्व प्रवर्गांमध्ये विभागण्यात आला आहे. ज्या नागरी व औद्योगिक वस्त्या अखंडित वीज पुरवठ्याकरिता अधिक वीज दर भरण्याची तयारी दर्शवितील, त्यांच्याकरिता रत्नागिरी गॅस पॉवर प्रा. लि आणि व्यापारी यांच्याकडील महागडी वीज राखून ठेवण्यात येईल, असे संभाव्य चित्र ३ मध्ये गृहीत धरण्यात आले आहे. नागरी व औद्योगिक वस्त्यांधील भार नियमनाचे तास कमी करण्याचे किंवा भारनियमन रद्द करण्याचे आर्थिक परिणाम दर्शविणारा तक्ता पुढीलप्रमाणे-

| तपशील | औरंगाबाद | ठाणे | वाशी | नागपूर | नाशिक |
|---|---|---|---|---|---|
| भार नियमन रद्द करण्यासाठी विद्युत भाराची दैनंदिन गरज (MU) | ०.६९ | २.४२ | ०.९८ | १.१६ | ०.६३ |
| विद्युत भाराची मासिक गरज (MU) | २०.५८ | ७२.४५ | २९.४० | ३४.८६ | १८.९० |
| अतिरिक्त वीज खरेदीवरील खर्च (कोटी) | ८.९३ | ३१.४४ | १२.७६ | १५.१३ | ८.२० |
| प्रतियुनिट वीज दरावरील दर्शक परिणाम (रु./युनिट) | १.३४ | २.०८ | ०.५७ | १.५६ | १.०४ |

३.२० वरील तक्त्यात वीज दरावर होणारा जो परिणाम दाखविण्यात आला आहे तो विजेच्या दरांव्यतिरिक्त असेल आणि नागरी व औद्योगिक वस्त्या जर हा आकार देण्यास इच्छूक असतील तरच त्यांना अखंडीत वीज पुरवठा मिळू शकेल.

३.२१ नागरी आणि औद्योगिक वस्त्यांकरिता अतिरिक्त वीज खरेदीवरील खर्च काढण्याकरिता, व्यापारी आणि रत्नागिरी गॅस पॉवर प्रा. लि. येथील वीज खरेदीचा सरासरी दर सुमारे रु. ४.३४ प्रति युनिट इतका स्वीकारण्यात आला आहे. वरील अपेक्षित आर्थिक भाराबाबतचा तक्ता सात तासांचे भार नियमन रद्द करण्यासाठीचा आहे. जर सर्व ग्राहकांसाठी एकाच तत्त्वाचा स्वीकार करण्यात आला तर, लागू करावयाचे भार नियमनाचे तास हे ५ तास ते ८ तास या दरम्यान असतील. या विश्लेषणासाठी, ७ तासाचे भार नियमन विचारात घेण्यात आले आहे. हानीसाठी कराव्या लागणा-या समायोजनेमुळे वीज दरावरील परिणामात आणखी भर पडेल.

## अः ४ वहन आकार ठरविणे

४.१ विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६२ नुसार पारेषण, वहन आणि किरकोळ वीज विक्रीचे दर राज्य विद्युत नियामक आयोगाने ठरवावयाचे आहेत.

४.२ कलम ४२ अन्वये आयोगाने वितरण यंत्रणेकरिता मुक्त प्रवेशाची टप्याटप्याने सुरुवात करावयाची असून त्याकरिता वितरण परवानेधारकाने एक सामायिक वाहक पुरविणे व दुसऱ्या पुरवठादारास त्याचा वापर करू देणे, हे त्याचे कर्तव्य राहील.

४.३ कलम ९ नुसार वितरण यंत्रणेचा वापर करणा-या स्वयं वापरासाठीच्या वीज ग्राहकांनी क्रॉस-सबसिडी अधिभार द्यावयाचा नसून त्यांनी फक्त वहन आकार भरावयाचा आहे, म्हणजेच, याचा अर्थ, निश्चित करण्यात आलेल्या वहन आकारांमध्ये कोणतीही अदृश्य क्रॉस-सबसिडी राहणार नाही.

४.४ दिनांक ६ जानेवारी २००६ रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या राष्ट्रीय वीज दरासंबंधीच्या धोरणातील खंड ८.५.५ मध्ये असे विनिर्दिष्ट करण्यात आले आहे की, " ज्या तत्त्वांच्या आधारे राज्यांतर्गत पारेषण आकार ठरविण्यात येतात त्याच तत्त्वांवर वहन आकार ठरविण्यात यावेत आणि त्या शिवाय त्यामध्ये संबंधित दाब पातळीच्या सरासरी तोट्याच्या भरपाईचा समावेश करण्यात येईल.'' खंड ७.१.(७) मध्ये विहीत करण्यात आले आहे की, राज्यांतर्गत पारेषण दर ठरविण्याकरिता 'दाब, अंतर, व विद्युत प्रवाहाची दिशा व परिमाण' हे घटक विचारात घेण्यात यावेत.

४.५ आयोगाच्या वीज दराच्या अटी व शर्तींनुसार प्रत्येक वितरण परवानाधारकाने वहन आणि किरकोळ वीज विक्रीचे दर निश्चित करण्यासाठी वेगवेगळे अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच, त्यातील तरतूदीनुसार प्रत्येक वितरण परवानेधारकाने वितरण व्यवसायाकरिता वेगळे अभिलेखे ठेवावयाचे असून त्यासाठी त्याने एक वाटप विवरणपत्रही तयार करावयाचे आहे ज्यामुळे वितरण परवानेधारकाने केलेल्या प्रत्येक अर्जाकरिता वीज दर ठरविणे आयोगास सोपे होईल.

४.६ तथापि, महा वितरण कंपनीने एआरआर आणि वीज दर याचिकेमध्ये वहनासाठी वेगळा दर प्रस्तावित केलेला नाही. तांत्रिक छाननी झाल्यानंतर, महा वितरण कंपनीने वहन व्यवसाय आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यातील खर्चाचे वाटप करण्यासाठी एक सूत्र सुचविले आहे. महा वितरण कंपनीकडे वहन आणि किरकोळ पुरवठ्यासाठी

वेगवेगळे लेखे नसले तरी त्यांनी, वहन आकार निश्चित करण्यासाठी वहन खर्च आणि किरकोळ वीज पुरवठ्यावरील खर्च, विशिष्ट गृहीतांवर आधारित वेगवेगळे ठेवणे आवश्यक आहे. आयोगाने टप्याटप्प्याने सुरु करावयाच्या मुक्त प्रवेशाचे विनियम निर्गमित केले आहेत. त्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी वेगळ्या केलेल्या खर्चावर आधारित असलेल्या वहन आकाराची गरज राहील.

४.७ जर एखाद्या ग्राहकाने महा वितरण कंपनी ऐवजी अन्य व्यक्तीकडून मुक्त प्रवेशाद्वारे वीज पुरवठा घेण्याचा पर्याय स्वीकारला, तर महा वितरण कंपनीच्या जाळ्याचा वापर करण्यासाठी त्या ग्राहकाला वहन आकार द्यावे लागतील. ग्राहकाने मुक्त प्रवेशाद्वारे पर्यायी वीज पुरवठा घेण्याचे ठरविले तर त्या विजेचे वहन करण्यासाठी तो महा वितरण कंपनीच्या जाळ्याचा वापर करेल. त्यासाठी जाळ्याशी संबधित असलेला खर्च अदा करणे आवश्यक आहे. सध्या महा वितरण कंपनी ही वीज वितरण आणि किरकोळ वीजपुरवठा हे दोन्ही व्यवसाय बघते. मुक्त प्रवेशाचा ग्राहक हा फक्त महा वितरण कंपनीच्या जाळ्याच्या मत्तेचा/सेवेचा लाभ घेणार असल्यामुळे त्याला किरकोळ वीज पुरवठ्यावरील खर्च अदा करावयाचा नसून मत्तेच्या/सेवेच्या वापरांसाठी वहन आकार द्यावा लागेल. यासाठी, महा वितरण कंपनीने वहनावरील खर्चाचे आणि किरकोळ विक्रीवरील खर्चाचे हिशोब वेग-वेगळे ठेवणे आवश्यक असून त्यामुळे वहनावरील आकार फक्त जाळ्याच्या व्यवसायावर झालेल्या खर्चाशी निगडीत राहतील.

४.८ औद्योगिक ग्राहकांना, जसे, उच्च दाब १ ग्राहकांना, सेवा देण्यासाठी महा वितरण कंपनीला करावा लागणारा एकत्रित खर्च खालील तक्त्यात दाखविला आहे-

| **खर्च/वीज दराचे तपशील** | **दर( रु./युनिट)** |
|---|---|
| पारेषणावरील खर्च | ०.३५ |
| वितरण (जाळ्यावरील) खर्च | ०.५७ |
| किरकोळ वीज पुरवठ्यावरील खर्च (हानी किरकोळ यांच्यासह वीज खरेदी) | ३.६७ |
| क्रॉस-सबसिडी | १.४५ |
| सरासरी वीज दर | ६.०३ |

४.९ वरील वाटप आणि आकडेवारी ही केवळ निर्देशक असून ती पुरवठ्याच्या सरासरी खर्चाच्या पध्दतीवर आधारित आहे. जर दाबावर आधारित खर्चाची पध्दत किंवा अन्य कोणताही पर्यायी मार्ग स्वीकारला तर त्यामुळे वरील आकडेवारीत बदल होतील. वरील तक्ता फक्त केलेल्या खर्चाचा प्रकार/ आकारण्यात आलेला वीज दर दाखविण्यासाठी आहे. वरील तक्त्यावरून दिसून येईल की, वितरण परवानाधारकाने (सरासरी खर्च पध्दतीवर आधारित) वहनावर केलेला खर्च सुमारे ५७ पैसे/युनिट आहे आणि महा वितरण कंपनीच्या वहन सेवाचा वापर केल्याबद्दल प्रत्येक ग्राहकाला हा आकार भरावा लागेल.

४.१० महा वितरण कंपनीच्या वहन सेवेचा वापर फक्त मुक्त प्रवेश घेणा-या ग्राहकांकडूनच नव्हे तर महा वितरण कंपनीकडून वीज पुरवठा होत असलेल्या घरगुती, रस्त्यावरील दिवे, वाणिज्यिक, शेती, औद्योगिक इ. या सारख्या अन्य सर्व ग्राहकांकडून देखील करण्यात येतो. वीज उद्योगात स्पर्धेस प्रोत्साहन देण्यासाठी, मुक्त प्रवेशाच्या अटी, शर्ती व दर यांचा वापर भेद-भावरहित असणे आवश्यक आहे. भेद-भावरहित मुक्त प्रवेश म्हणजे त्यांच्या यंत्रणेचा वापर दुसऱ्या पुरवठादारास करू देणे. यामध्ये ग्राहकाचा पुरवठादार कोणीही असला तरी महा वितरण कंपनीने सर्व ग्राहकांना एकच दर आकारला पाहिजे. वीज पुरवठादार हा महा वितरण कंपनी, स्वयं-वापरासाठीचा वीज निर्मिती प्रकल्प किंव वीज निर्मिती केंद्र/ व्यापारी / अन्य वितरण परवानाधारक यांपैकी कोणीही असू शकेल.

४.११ भेदभाव-रहित वीज दरांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी, खर्च आणि वीज दरांची पुनर्रचना होणे आवश्यक राहील.

४.१२ ग्राहक किंवा स्वारस्य असलेल्या व्यक्तींनी महा वितरण कंपनीचा प्रस्ताव काळजीपूर्वक पहावा आणि वहन आकार निश्चित करण्यासाठी त्यांच्या सूचना व अभिप्राय कळवावेत.

---